शपथेवर उलट–तपास श्री केदार विधीज्ञ मार्फत गैरअर्जदारातर्फे :–

१०. हे म्हणणे खरे आहे की बॅकेने मला दि.२०.०६.२०१९ रोजी पत्र दिले होते, त्यामध्ये माझया शिल्लक रजा बाबत नमुद होते. हे म्हणणे खरे आहे की सदर पत्राच्या अनुषगांने मी बॅकेला कळविले की सदर रजा मला घेणे नसुन त्याबाबत मला काम करावयाचे आहे. सदर दस्तास नि.क्र.यु–२३ देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदार यांनी मला दि.११.०२.२०२० रोजी पत्र देवून कळविले होते की तुम्हाला आजारी रजा पैकी ९० दिवसाच्या आजारी रजेचा पगार देण्यात येईल व पुढे आपण काम करीत राहा. दि.११.०२.२०२० रोजी बॅकेने मला दिलेल्या पत्राबाबत मी बॅकेला दि.२४.०२.२०२० च्या पत्रानुसार कळविले होते.

प्रश्न :– तुम्ही बॅकेला ९० दिवसाचा आजारी रजेचा पगार घेवुन काम करण्यास तयार नाही असे कळविले होते का ?

उत्तर :– बॅकेने मला पुढे काम करण्यास सांगितले होते.

११. हे म्हणणे खरे आहे की मला बॅकेने दि.११.०२.२०२० रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने मी बॅकेमध्ये पुढे काम करीत राहीलो. मला बॅकेच्या सेवा नियमावली बाबत माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की मी दि.२३.०८.२०१९ रोजी दिलेल्या पत्राव्दारे बॅकेला कळविले होते की मला नियमानुसार लाभ देण्यात यावा. हे म्हणणे खरे आहे की मी बॅकेच्या नियमावली नुसार मला मिळणारे लाभ घेण्यास तयार होतो. हे म्हणणे खरे नाही की बॅकेच्या नियमावली पेक्षा जास्त लाभ मला मिळण्याकरीता मी सदर अर्ज दाखल केलेला आहे. हे मला माहीत नाही की बॅकेने वेळोवेळी घेतलेल्या

ठरावानुसार त्यांचे कामकाज चालते. हे मला माहीत नाही की माझया निवृती नंतर च्या लाभाबाबत बॅकेच्या संचालक मंडळाने ठराव घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की बॅक ही मला ९० दिवसाचा आजारी रजेचा पगार देण्यास तयार होती, परंतु तो मी घ ेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की मला बॅकेच्या नियमावली पेक्षा जास्त पगार पाहीजे असल्यामुळे मी हे खोटे प्रकरण दाखल केले आहे.

प्रश्न — त्याचप्रमाणे बॅकेने तुमच्या निवृत्ती वेतनाबाबत जे ठराव घेतले, त्याबाबत तुम्ही आक्षेप घेतला नाही ?

उत्तर — बॅकेने घेतलेल्या ठरावाबाबत मला माहीती नाही.

हे म्हणणे खरे नाही की मी खोटे शपथपत्र दाखल केले असुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास — काही नाही

माझे समक्ष

स्वाक्षरी/—

(श्रीमती रू.वि. मेटे)

न्यायाधीश

कामगार न्यायालय, चंद्रपुर

चंद्रपुर.

दि.०९.०३.२०२३.